# कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

## सेवानिवृत्त (राजपत्रित) संवर्गातील अधिका-याची सेवा करार तत्वावर घेण्याबाबत.

कला संचालनालयाच्या अंतर्गत येणा-या मुंबई येथील कार्यालय/ संस्था यांचे कामकाजासाठी राज्य शासनाच्या प्रशासकीय विभागातून गट-ब संवर्गातून सेवानिवृत्त झालेल्या राजपत्रित अधिकारी यांची सेवा १ वर्षासाठी करारपध्दतीने उपलब्ध घेण्याबाबत अर्ज मागविण्यात येत आहे.

या संदर्भातील विवक्षित कामाचे/ सेवेचे स्वरुप साधारणत: खालील प्रमाणे असेल:

| अ.क्र. | संवर्ग | विवक्षित कामाचे स्वरुप | वय, अर्हता व अनुभव | पदसंख्या |
|---|---|---|---|---|
| १ | गट "ब" (राजपत्रित) | भारतरत्न लता दीनानाथ मंगेशकर आंतरराष्ट्रीय संगीत महाविद्यालयाच्या कामकाजाचे व्यवस्थापन करणे, कला संचालनालयाचा अधिनियमाची अंमलबजावणी करणे, सर ज.जी.कला, वास्तुशास्त्र व अभिकल्प या डि-नोव्हो विद्यापीठाचे प्रशासकीय कामकाज करणे व तद्नुषंगिक कामे | ➢ वयोमर्यादा-५८ ते ६५ वर्षापर्यंत<br>➢ उमेदवारास शासकीय सेवेतील वित्तीय / प्रशासनिक कामाचा अनुभव असावा<br>➢ उमेदवारास संगणक हताळण्याचे ज्ञान असावे.<br>➢ अर्हता-पदवीधर | ३ (९ अधिकाऱ्यांची नामिका सूचि तयार करण्यात येईल.) |

**नियुक्तीच्या अटी व शर्ती**

१. सामान्य प्रशासन विभाग क्र. संकीर्ण - २७१५/प्र.क्र. १००/१३, दि. १७.१२.२०१६ मध्ये नमूद अटी व शर्तीच्या आधारे नियुक्ती करण्यात येईल. सदर शासन निर्णयानुसार मासिक पारिश्रमिक व भत्ते निश्चित करण्यात येतील.
२. पात्रता व गुणवत्तेनुसार ९ अधिकाऱ्यांची नामिका सूचि तयार करण्यात येईल.
३. करार पध्दतीने कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई या कार्यालयामध्ये नियुक्त केलेल्या व्यक्तींना कोणतेही पदनाम असणार नाही व अर्जित, नैमित्तिक व वैद्यकिय रजा अनुज्ञेय असणार नाही.
४. नियुक्तीच्या कालावधीत विवक्षित काम पूर्ण करण्याची जबाबदारी करार पध्दतीने नियुक्ती देण्यात आलेल्या व्यक्तींची असेल.
५. करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींना कोणत्याही प्रकारचे प्रशासकीय / वित्तीय अधिकार असणार नाहीत. अशी व्यक्ती कोणत्याही शासकीय पत्र / आदेश यावर स्वाक्षरी करण्यास पात्र राहणार नाही.
६. मुलाखतीद्वारे पात्र उमेदवारांची निवड करण्यात येईल. उमेदवार निवडीबाबतचा संपूर्ण अधिकार संचालक, कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचा राहिल. मुलाखतीचा दिनांक अर्जदारांना कळविण्यात येईल.
७. उपरोक्त अटी व शर्तीसोबत सामान्य प्रशासन विभागाच्या दि.१७.१२.२०१६ च्या शासन निर्णयातील सर्व अटी व शर्ती बंधनकारक राहतील.

इच्छूक सेवानिवृत्त शासकीय अधिकाऱ्यांनी शारीरिक व मानसिक आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असल्याचे प्रमाणपत्र, आवश्यक त्या शैक्षणिक अर्हता व अनुभवाच्या प्रमाणपत्रासह ही जाहिरात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून दि.३१.०३.२०२४ रोजी सायं.०६.१५ वाजेपर्यंत त्यांचे अर्ज विहित नमुन्यात खालील नमूद पत्यावर पोस्टाद्वारे, व्यक्तीश: अथवा ई-मेल (directorateofart@gmail.com) द्वारे सादर करावेत. विहीत दिनांकानंतर प्राप्त होणारे अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

संपर्क :- **कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, सर ज.जी.कला शाळा आवार, डॉ.दा.नौ.मार्ग,मुंबई. ४०० ००१**

**ई-मेल :-** directorateofart@gmail.com

सही/-
कला संचालक,
कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य,मुंबई.

**नियुक्तीच्या अटी व शर्ती**

१. सामान्य प्रशासन विभाग क्र. संकीर्ण - २७१५/प्र.क्र. १००/१३, दि. १७.१२.२०१६ मध्ये नमूद अटी व शर्तीच्या आधारे नियुक्ती करण्यात येईल. सदर शासन निर्णयानुसार मासिक पारिश्रमिक व भत्ते निश्चित करण्यात येतील.
२. करार पध्दतीने कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई या कार्यालयामध्ये नियुक्त केलेल्या व्यक्तींना कोणतेही पदनाम असणार नाही व अर्जित, नैमित्तिक व वैद्यकिय रजा अनुज्ञेय असणार नाही.
३. नियुक्तीच्या कालावधीत विवक्षित काम पूर्ण करण्याची जबाबदारी करार पध्दतीने नियुक्ती देण्यात आलेल्या व्यक्तींची असेल.
४. करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींना कोणत्याही प्रकारचे प्रशासकीय / वित्तीय अधिकार असणार नाहीत. अशी व्यक्ती कोणत्याही शासकीय पत्र / आदेश यावर स्वाक्षरी करण्यास पात्र राहणार नाही.
५. अर्जदार कक्ष अधिकारी / प्रबंधक (गट-ब) या पदावरुन सेवानिवृत्त झालेला असावा.
६. गट-ब (ग्रेड पे ७६००/-पेक्षा कमी) पदावरील प्रशासकीय / वित्तीय कामकाजाचा अनुभव व संगणक हाताळण्याचे पुरेशे ज्ञान असणे आवश्यक आहे.
७. अर्जदाराचे वर्य ६५ वर्षापेक्षा जास्त नसावे.
८. आवश्यक अर्हता धारण करणाऱ्या इच्छूक सेवानिवृत्त अधिकाऱ्यांनी सोबतच्या विहित नमुन्यात अर्ज सादर करावा.
९. अर्जदार शारीरिक, मानसिक वा आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असावा, तसेच तो निर्व्यसनी असावा.
१०. अर्जदाराविरुध्द कोणतीही विभागीय चौकशी चालू अथवा प्रस्तावित नसावी अथवा चौकशी प्रकरणी कोणतीही शिक्षा झालेली नसावी.
११. अर्जदारांनी विहित दिनांकाच्या आत अर्ज सादर करावा, विहित दिनांकानंतर प्राप्त झालेल्या अर्जावर कार्यवाही करण्यात येणार नाही व कोणत्याही पत्रव्यवहाराची दखल घेण्यात येणार नाही. तसेच नियुक्तीची प्रक्रिया कोणत्याही टप्यात रद्द करण्याचे अधिकार कला संचालक यांना राहतील.
१२. मुलाखतीद्वारे पात्र उमेदवारांची निवड करण्यात येईल. उमेदवार निवडीबाबतचा संपूर्ण अधिकार संचालक, कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचा राहील. मुलाखतीचा दिनांक अर्जदारांना कळविण्यात येईल.
१३. सदर नियुक्ती १ वर्ष कालावधीकरिता करण्यात येणार आहे. कामाची आवश्यकता असल्यास व कामकाज समाधानकारक असल्यास मुदतवाढ देण्याबाबतचा अधिकार कला संचालकांना राहील.
१४. करार पध्दतीने नियुक्त सेवानिवृत्त अधिकाऱ्यास कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई व भारतरत्न लता दीनानाथ मंगेशकर आंतरराष्ट्रीय संगीत महाविद्याय, मुंबई येथे काम करावे लागेल.
१५. करार पध्दतीने नियुक्ती करण्यात आल्यामुळे शासनाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाबाबत / सामावून घेण्याबाबत वा नियमित सेवेचे इतर कोणतेही लाभ मिळण्याचा अधिकार / हक्क नसेल.
१६. करार पध्दतीने नियुक्ती केलेल्या अधिकाऱ्यास नेमून दिलेली कामे पूर्ण करण्याची जबाबदारी राहील.
१७. नियुक्ती प्राधिकारी यांना विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी अशा अधिकाऱ्यांच्या करार पध्दतीवरील सेवा समाप्त करण्याचे अधिकार राहतील.
१८. करार पध्दतीने नियुक्तीच्या कालावधीत सोपवलेली कामे पार पाडण्यात व्यत्यय निर्माण होईल, अशा कोणत्याही व्यावसायिक कामात गुंतता येणार नाही.
१९. करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीने गुंतलेले हितसंबंध जाहिर करणे आवश्यक राहील.
२०. करार पध्दतीच्या कालावधीत आवश्यक प्रसंगी दौरा करावा लागल्यास त्यांना त्यांच्या निवृत्तीवेळेच्या वेतनमानास अनुसरुन प्रवासभत्ता व दैनिक भत्ता अनुज्ञेय राहील.
२१. सोपविलेले कामकाजाचा वेळोवेळी आढावा घेऊन कामाचे मूल्यमापन करण्यात यईल.
२२. करार पध्दतीने नियुक्तीच्या कालावधीत कामकाजा दरम्यान प्राप्त होणारी कागदपत्रे/ माहिती व आधार सामुग्रीबाबत गोपनीयता पाळणे बंधनकारक राहील.
२३. उपरोक्त अटी व शर्तीसोबतच सामान्य प्रशासन विभागाच्या दि.१७.१२.२०१६ च्या शासन निर्णयातील सर्व अटी व शर्ती बंधनकारक राहतील.

-----------------------------------------

# अर्जाचा नमूना

## करार पध्दतीने नियुक्तीसाठी अर्ज

(शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३, दि.१७.१२.२०१६)

| | |
|---|---|
| | पासपार्ट साईज फोटो |
| उमेदवाराचे संपूर्ण नाव:- | |
| पत्र व्यवहाराचा पत्ता व ई-मेल :- | |
| दूरवध्नी क्रमांक/ भ्रमणध्वनी क्रमांक:- | |
| जन्म दिनांक व दिनांक १ मार्च २०२४ रोजी असलेले वय:- | |
| सेवानिवृत्तीचा दिनांक व सेवानिवृत्तीच्या वेळेस धारण केलेले पद | |
| प्रवर्ग | |
| सेवानिवृत्तीचे वेतन घेत असलेल्या बँकेचे नाव, खाते क्रमांक:- | |
| शैक्षणिक अर्हता- अर्हता, बोर्ड/ विद्यापीठाचे नाव, उत्तीर्ण वर्ष, टक्केवारी, श्रेणी याबाबतच्या तपशीलासह | |
| संगणक व इतर अर्हता:- | |
| शासकीय कामकाजाचा अनुभव (याबाबत पदनाम, कालावधी, केलेल्या कामाचा स्पष्ट तपशील नमूद करावा) | |
| प्रमाणित करण्यात येते की उपरोक्त नमूद माहिती सत्य व अचूक असून निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर अथवा नियुक्तीनंतर उपरोक्त माहिती पैकी कोणतीही माहिती असत्य /चूकीची असल्याचे निदर्शनास आल्यास माझी निवड कोणतीही पूर्व सूचना न देता रद्द करण्यास पात्र असल्याची आणि त्याबाबत कायदेशीर कार्यवाही होऊ शकते याची मला पूर्ण जाणीव आहे. | |
| कंत्राटी पदावरील नियुक्तीच्या सर्व अटी व शर्ती मला मान्य आहे. सदर नियुक्ती पूर्णपणे कंत्राटी स्वरूपाची निव्वळ तात्पुरत्या स्वरुपातील नियुक्त असल्याची मला जाणीव असून सदर नियुक्तीमुळे शासनातील कोणत्याही पदावर माझा धारणाधिकार हक्क निर्माण होत नाही. मी नमूद केलेल्या तपशिलाच्या सत्यप्रती मला मागणी केल्यास मी सादर करण्याची हमी देत आहे. | |

दिनांक:-

स्थळ:-

उमेदवाराचे नाव स्वाक्षरी

- वरील प्रमाणे नमूद सर्व कागदपत्रांच्या छायांकित व स्वाक्षांकित प्रति जोडणे आवश्यक.